राज्यातील अतिवृष्टीमुळे आलेला महापूर व विस्कळीत झालेले जनजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करणे.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण- ५०१९/प्र.क्र.६७८/आस्था-१४

२५ मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,

मुंबई ४०० ००१

दिनांक : २० ऑगस्ट, २०१९

शासन परिपत्रक :-

यावर्षीच्या पावसाळयात राज्यात सर्वतो मोठयाप्रमाणात पाऊस झालेला आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे नदयाना पूर येवून, पूराचे पाणी नागरी वसाहतीमध्ये रस्त्यांवर तसेच शेतामध्ये गेल्याने, शेती व रस्त्यांसह लोकांचे जनजीवन पूर्णत: विस्कळीत झालेले आहे. सातत्याने ८ ते १० दिवस पूराचे पाणी न ओसरल्याने सांगली व कोल्हापूर जिल्हयांमध्ये अत्यंत दयनीय अवस्था निर्माण झालेली आहे. लोकांना राहण्याची जागा, पिण्याचे शुध्द पाणी, औषधे, अन्न, वस्त्र इत्यांदीची तातडीने गरज आहे. या गरजा भागविण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. असे असले तरी, अतिवृष्टीमुळे आलेल्या महापूराने मोठयाप्रमाणात जनजीवन बाधित झालेले आहे.

महापूरामुळे झालेल्या नुकसानाची वर्गवारी करुन त्याची मोजदाद करणे, त्याचे मुल्यांकन काढणे, तसेच शेती,जनावरे याचे झालेले नुकसान त्यांचे मुल्यांकन या सर्व गोष्टींची माहिती जमा करण्यासाठी मोठयाप्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता लागणार आहे. संबंधित जिल्हयातील पूर परिस्थितीमुळे सर्वसामान्य जनतेबरोबरच त्याठिकाणी रहात असलेले, जिल्हा परिषदेचे अधिकारी/कर्मचारी यांच्याही मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. त्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबियांवरदेखील झालेला आहे. अशा परिस्थितीत त्या त्या जिल्हयातील जिल्हा परिषदेचा

कर्मचारी वर्ग मोठयाप्रमाणात उपलब्ध होईलच याची शाश्वती नाही..

यासंदर्भात आता, शासन पुढीलप्रमाणे र्कायवाही करण्याच्या सूचना देत आहे.

यावर्षीच्या अतिवृष्टीमूळे आलेल्या महापूरामुळे मोठया प्रमाणात मालमत्तेसह शेती, जनावरे, रस्ते, पुल इत्यादींची मोठया प्रमाणात हानी झालेली आहे. झालेल्या नुकसानीतून जनजीवन पूर्ववत आणण्यासाठी नुकसानीची मोजदाद करणे, लोकांच्या आरोग्याच्यादृष्टीने आरोग्यसेवा उपलब्ध करुन देणे, शुध्द पाणी, निवारा, वस्त्रे यांची उपलब्धतता करुन देणे तसेच शासन महापूरामुळे बाधित झालेल्या लोकांसाठी जे काही धोरणात्मक निर्णय घेईल, त्याची सक्षमपणे अंमलबजावणी करण्याकरिता मोठया प्रमाणात कर्मचारी वर्ग लागण्याची शक्यता आहे. यासाठी विभागीय आयुक्तांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी. :-

१) संबंधित विभागीय आयुक्तांनी त्यांच्या अधिनस्थ जिल्हयामधील जो जिल्हा पूरबाधित झालेला आहे, त्या जिल्हयातील सर्वप्रथम उपलब्ध जिल्हा परिषद कर्मचारी वर्ग या कामासाठी उपयोगात आणावा.

२) संबंधित जिल्हा परिषदेमध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध न झाल्यास, नजिकच्या जिल्हयातील आवश्यक तेवढा कर्मचारी वर्ग, अशा पूरबाधित जिल्हयातील पूर्नवसनाच्या कामासाठी वापरू शकतात. तसा कर्मचारी वर्ग नियुक्त करण्याचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्तांना देण्यात येत आहेत.

३) त्यांच्या अधिनस्थ जिल्हयातील जिल्हा परिषदेतील कर्मचारी वर्ग अपूरा पडत असल्यास, ते नजिकच्या विभागातील कर्मचाऱ्यांची मागणी करु शकतात. पंरतू त्यासाठी शासनाकडे सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे शासन त्या प्रस्तावावर योग्य ते आदेश देईल.

४) विभागीय आयुक्तांनी सदरची कार्यवाही तातडीने सुरु करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०८२०११०४३८८१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2019.08.22 16:40:23 +05'30'

(प्रि.शं.कांबळे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव

३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव

४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

५) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई

७) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग

८) सर्व विभागीय आयुक्त

९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

१०) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)

११) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.

१२) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग,

१३) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास विभाग, मुंबई-३२